## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०३/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन धारदार वस्तुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०३/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी उमेश मारोती मालोदे वय ३५ वर्ष, रा. निलज याने आरोपीला आपले वाहन रोडने हळुहळु चालवित जा असे बोलले असता आरोपीने भांडण करुन त्याचे जवळील धारदार वस्तुने फिर्यादीचे डावे हाताचे अंगठयावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना लांजेवार पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, पायी मुलीस धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०३/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी चितांमन मन्साराम तिबुडे वय ४० वर्ष, रा. नवेगाव बु. यांची मुलगी कु. चांदनी वय ०८ वर्ष, रा. नवेगाव ही आपल्या लहान बहीनीस अंगनवाडीतुन आनण्यास रोड वरुन पायी– पायी जात असता यातील आरोपीने मोटार सायकल भरधाव बेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलीस मागेहुन धडक मारुन तिच्या उजव्या घुडग्याच्यावर व पोटरीला व पाठीला किरकोळ दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४/१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) अवैद्यरित्या चारचाकी वाहनात जनावरे कोंबुन भरुन नेतांना वाहन पलटी होवुन तेथील १ गाय जखमी झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०३/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातील टाटा सुमो गाडी चालक व मालक यांनी आपले ताब्यातील गाडी हयगयीने चालवुन गाडीच्या सिटा काढुन त्यामध्ये अवैद्यरित्या १ गाय, ३ बैल असे एकुण ४ जनावरे किमंती ८,०००/—रु. चे कोंबुन भरुन वाहतुक करतांनी प्रवासा दरम्यान टाटा सुमोचा अपघात होवुन पलटी झाली त्यामुळे तेथील १ गाय जखमी होऊन लंगडी झाल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,४२९ भादंवि. सहकलम ११(१)(ड)प्रा. नि.वा.कायदा १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

अ) दिनांक २५/०३/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाचे आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ६६६९ चा चालकाने दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. हाके वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम १८५(१),३/१८१ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मते पोस्टे कारधा हे करीत आहेत.

ब) दिनांक २५/०३/२०१७ चे १९.३५ वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ टिसी चा चालकाने दारु पिऊन दारुचे नशेत बिना लायसन्स व वाहनाचे कागदपत्र सोबत न बाळगता चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. डोंगरवार वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम १८५(१), १८१,१३९ सीएमव्हीआर/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मते पोस्टे कारधा हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक २५/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी क्र. ९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.